RNI No. MAHBIL/2009/31748




# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष २, अंक १८(३)] शनिवार, जून १९, २०१०/ज्येष्ठ २९, शके १९३२ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक ७८

प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ एप्रिल २०१०

**महानगरपालिका क्षेत्रात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करणेबाबतचे सुधारणा आदेश, २०१०**

**भारताचे संविधान.**

क्रमांक रानिआ./मनपा. २००४/प्र.क्र. १३/का-५.—ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के आणि २४३ झेडए मधील तरतुदीनुसार पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन आणि नियंत्रण राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने समक्रमांकाच्या दिनांक ७ जानेवारी २००५ अन्वये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करून महानगरपालिका निवडणुकांमध्ये मतदान करण्यासंदर्भातील कार्यपद्धती ठरवून देणारे आदेश निर्गमित केले आहेत ;

आणि ज्याअर्थी, सदर आदेश व मतदान केंद्राध्यक्षांची नियमपुस्तिका यामध्ये असलेली विसंगती दूर करण्याच्या दृष्टीने काही सुधारणा करणे आवश्यक आहे;

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए अन्वये तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ चा मुंबई ३) चे कलम १८अ (४), नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (१९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २) चे कलम ९(४), मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) चे कलम १४(४) अन्वये या संदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र. १३/का. ५, दिनांक ७ जानेवारी २००५ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :—

१. परिच्छेद क्रमांक १४ (२) ऐवजी,—

" १४ (२) एखाद्या व्यक्तीने उपरोक्त नमूद मतदार नोंदवहीत अंगठ्याचा ठसा उमटवल्यास मतदान केंद्राध्यक्ष अथवा मतदान अधिकारी अथवा अन्य कोणताही अधिकारी यांनी अंगठ्याचा ठसा साक्षांकित करणे आवश्यक नाही. "

- असा मजकूर समाविष्ट करण्यात यावा.

२. परिच्छेद क्रमांक १६ (१) मधील सुरूवातीच्या परिच्छेदाऐवजी,—

" १६. **अंध अथवा अपंग मतदारांनी मत नोंदविणे.**— (१) एखादा मतदार त्याच्या अंधत्वामुळे अथवा अन्य शारीरिक अपंगत्वामुळे त्याला सहाय्य मिळाल्याशिवाय बॅलटींग युनिटवरील चिन्हे ओळखून योग्य ते बटन दाबून मत नोंदविण्यास असमर्थ आहे, अशी मतदान केंद्राध्यक्षांची खात्री झाल्यास मतदारास १८ वर्षापेक्षा कमी वय नसलेला सहाय्यक त्याच्यासोबत मतदान कक्षात घेऊन जाण्यास व त्याच्या इच्छेनुसार मतदान करण्यास अनुमती देईल. "

- असा मजकूर समाविष्ट करण्यात यावा.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

**श. मा. भुते,**
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.